# ‘नॅक’ समितीचा विविध घटकांशी संवाद



**कोल्हापूर :** ‘नॅक’ पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीसाठी शिवाजी विद्यापीठात दाखल झालेल्या पीअर टीमने मंगळवारी दिवसभरात विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांशी संवाद साधला; तसेच विविध सोयीसुविधांची पाहणी केली. प्रा. जे.पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील टीमने सकाळच्या सत्रात ग्रंथालय, दुर्मीळ हस्तलिखिते केंद्र, क्रीडा विभाग व तेथील सिंथेटिक ट्रॅकसह अन्य क्रीडा सुविधा, योग केंद्र, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कौशल्य व उद्योजकता व विकास केंद्र, वसतिगृहे, आरोग्य केंद्र, मुद्रणालय, आयक्यूएसी कक्ष व क्वालिटी बेंचमार्किंग लॅबोरेटरी, आदींची पाहणी केली. दुपारच्या सत्रात विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी यांच्यासह विविध अधिकार मंडळे, व्यवस्थापन, शासन प्रतिनिधी व विद्यापीठ प्रतिनिधींसोबत संवाद साधला.

पुण्यनगरी

# ‘नॅक’ समितीकडून विद्यार्थी-पालकांशी संवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

‘नॅक’ पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीसाठी शिवाजी विद्यापीठात दाखल झालेल्या पिअर टीमने मंगळवारी दिवसभरात विद्यार्थी, पालक आणि माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याचबरोबर दिवसभरात विविध सोयी-सुविधांची पाहणी केली. बुधवारी नॅक समितीच्या पाहणीचा अंतिम दिवस असून, उर्वरित विभाग व सुविधांची पाहणी समिती करणार आहे.

प्रा. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील नॅक पिअर टीमने सकाळच्या सत्रात ग्रंथालय, दुर्मीळ हस्तलिखित केंद्र, क्रीडा विभाग व तेथील सिंथेटिक ट्रॅकसह अन्य क्रीडा सुविधा, योग केंद्र, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कौशल्य व उद्योजकता व विकास केंद्र, वसतिगृहे, आरोग्य केंद्र, मुद्रणालय, आयक्यूएसी कक्ष व क्वॉलिटी बेंच मार्किंग लॅबोरेटरी आदींची पाहणी केली. दुपारच्या सत्रात विद्यार्थी, पालक व माजी विद्यार्थी यांच्यासह विविध अधिकार मंडळे, व्यवस्थापन, शासन प्रतिनिधी व विद्यापीठ प्रतिनिधी यांच्यासमवेत संवाद साधला.



# ‘नॅक’च्या समितीने साधला माजी विद्यार्थ्यांशी संवाद

## विद्यापीठातील मूल्यांकनाचा आज अखेरचा दिवस : संगणक केंद्र, क्रीडा विभागाची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्यावतीने (नॅक) पुनर्मूल्यांकन प्रक्रियेच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी समितीने माजी विद्यार्थी, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. संगणक केंद्र, क्रीडा विभागातील सुविधांची पाहणी केली. मूल्यांकन प्रक्रियेचा आज, बुधवारी अखेरचा दिवस आहे.

डॉ. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील नॅक समिती सकाळी ९ वाजता विद्यापीठात दाखल झाली. सुरुवातीला त्यांनी ग्रंथालय, दुर्मीळ हस्तलिखिते केंद्र, क्रीडा विभाग, सिंथेटिक ट्रॅकसह अन्य क्रीडा सुविधा, योग केंद्र, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कौशल्य व उद्योजकता व विकास केंद्र, वसतिगृहे, आरोग्य केंद्र, मुद्रणालय, आयक्यूएसी कक्ष व क्वॉलिटी बेंचमार्किंग लॅबोरेटरी आदींची पाहणी केली. त्यानंतर दुपारच्या सत्रामध्ये राजर्षी शाहू सभागृहात माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यात ‘लोकमत’चे संपादक वसंत भोसले, गोवा येथील ‘एनआययो’मधील ज्येष्ठ शास्त्रज्ञ मंदार नानसकर, पुण्यातील ‘एनसीएल’चे ज्येष्ठ शास्त्रज्ञ पी. पी. वडगावकर, वस्तू व सेवाकर, कोल्हापूर विभागाच्या सहआयुक्त तेजस्विनी मोरे, वैद्यकीय क्षेत्रातील रणजित देसाई, बायोसायन्स क्षेत्रातील डॉ. विनायक केडगे, विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे निमंत्रक डॉ. प्रवीण कोडोलीकर, आदी ५० माजी विद्यार्थ्यांचा समावेश होता. या विद्यार्थ्यांच्या विद्यापीठाबाबतच्या भावना, मते, सूचना या समितीने जाणून घेतल्या.

विद्यापीठाची कमवा व शिका योजना, प्रशासन चांगले असल्याचे या माजी विद्यार्थ्यांनी सांगितले. पीएच.डी.च्या माध्यमातून संशोधन करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला फेलोशिप देण्यात यावी, अशी सूचना काही विद्यार्थ्यांनी केली. सायंकाळच्या सत्रात कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ‘आयक्यूएसी’चे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आणि विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषदेसह विविध अधिकार मंडळांतील सदस्य, शासनाचे प्रतिनिधी, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसमवेत समिती सदस्यांनी संवाद साधला. या समितीच्या विद्यापीठातील मूल्यांकन प्रक्रियेत बुधवार अखेरचा दिवस आहे.

### विद्यापीठाबाबतची आपुलकी जाणवली

माजी विद्यार्थ्यांसमवेतच्या संवादावेळी ‘लोकमत’चे संपादक वसंत भोसले यांची भेट झाली. त्यांनी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग आणि विद्यापीठाची काही माहिती दिली. इतक्या मोठ्या पदावरील व्यक्ती या मेळाव्यासाठी उपस्थित राहिली. त्यावरून माजी विद्यार्थ्यांचे विद्यापीठाबाबतचे ऋणानुबंध, आपलुकी आणि आस्था जाणवली, असे ‘नॅक’ समितीचे अध्यक्ष डॉ. जे. पी. शर्मा यांनी विविध अधिकार मंडळांतील सदस्यांसमवेतच्या बैठकीपूर्वी उपस्थितांशी चर्चा करताना सांगितले.



# विद्यापीठामुळेच यशस्वी झालो

## नॅक समितीचा माजी विद्यार्थ्यांशी संवाद

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाने केवळ ज्ञानच दिले नाही, तर आत्मविश्वास दिला. कमवा व शिका योजनेमुळे शिक्षणातील आर्थिक अडसर दूर झाला. विद्यापीठातील कालावधी अनेक गोष्टी शिकवून गेला. त्यामुळेच जीवनात यशस्वी झालो, अशा भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. त्यांच्याशी आज नॅक समितीच्या सदस्यांनी संवाद साधला. त्यानंतर सदस्यांनी विविध अधिविभागांना भेटी दिल्या.

नॅक समितीचे अध्यक्ष प्रा. जे.पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील नॅक पिअर टीमने सकाळच्या सत्रात ग्रंथालय, क्रीडा विभाग व तेथील सिंथेटिक ट्रॅकसह अन्य क्रीडा सुविधा, योग केंद्र, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, वसतिगृहे, आरोग्य केंद्र, मुद्रणालय, आयक्यूएसी कक्ष व क्वालिटी बेंचमार्किंग लॅबोरेटरी आदींची पाहणी केली.

दुपारच्या सत्रात त्यांनी सिनेट सभागृहात माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे त्यांच्या जीवनातील महत्त्व विशद केले. अभ्यासक्रम अधिक ज्ञानवर्धक असल्याचे सांगितले. त्यामुळे स्पर्धेत टिकण्याचा आत्मविश्वास मिळाला. कमवा आणि शिका योजनेमुळे शिक्षणातील अडसर दूर झाले. प्राध्यपकांनी अभ्यासक्रमाबरोबरत संशोधनातील, करिअरमधील जागतिक संधींची जाणीव करून दिली. शिवाजी विद्यापीठामुळेच जीवनात यशस्वी होऊ शकलो. अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. विद्यापीठाच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे? माजी विद्यार्थ्यांची मदत कशी होऊ शकते? याबाबतही सदस्यांनी माजी विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

समितीचे अध्यक्ष डॉ. जे. पी. शर्मा, सचिव डॉ. बी. आर. कौशल, डॉ. ए. ए. मौनीद्दीन, डॉ. तरुण अरोरा, डॉ. हरिशचंद्रा दास उपस्थित होते.

**मान्यवर माजी विद्यार्थी**

एन.आय.ओ (गोवा) येथील शास्त्रज्ञ डॉ. मंदार नानसकर, एन.सी.एल. (पुणे) येथील शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगावकर, माय लॅब सोल्युशनचे डॉ. रणजित देसाई, जीएसटी उपायुक्त तेजस्विनी मोरे, डॉ. विनायक केडगे, डॉ. परशुराम पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

तरुण भारत

# 'नॅक' समिती विविध घटकांशी संवाद

कोल्हापूर

'नॅक' पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीसाठी शिवाजी विद्यापीठात दाखल झालेल्या पिअर टीमने मंगळवारी विद्यापीठातील विविध घटकांशी संवाद साधला. प्राथमिक सोयीसुविधांबरोबर ग्रंथालयातील दुर्मीळ हस्तलिखिते, क्रिडा विभाग, सिंथेटिक ट्रॅकसह अन्य सुविधांची पाहणी केली.

प्रा. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील नॅक पिअर टीमने सकाळच्या सत्रात विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, कौशल्य व उद्योजकता व विकास केंद्र, वसतिगृहे, आरोग्य केंद्र, मुद्रणालय, आयक्यूएसी कक्ष व क्वॉलिटी बेंचमार्किंग लॅबोरेटरी, पाणी व्यवस्थापन, कमवा व शिका योजना, संशोधनासाठीची उपकरणे आदींची पाहणी केली. दुपारच्या सत्रात विद्यार्थी, पालक व माजी विद्यार्थी यांच्यासह विविध अधिकार मंडळे, व्यवस्थापन, शासन प्रतिनिधी व विद्यापीठ प्रतिनिधी यांच्यासमवेत संवादही साधला. बुधवारी १७ रोजी नॅक समितीचा पाहणीचा अंतिम दिवस असून उर्वरित विभाग व सुविधांची पाहणी करुन गोपनीय अहवाल अंतिम करण्यासह अन्य बाबी पूर्ण केल्या जाणार आहेत.



- विद्यापीठ नॅक पुनर्मूल्यांकनाचा दुसरा दिवस

यावेळी माजी विद्यार्थी म्हणून एनआययोमधील ज्येष्ठ शास्त्रज्ञ मंदार नानसकर, पुण्यातील एनसीएलचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ पी. पी. वडगावकर, वस्तू व सेवाकर, कोल्हापूर विभागाच्या सहआयुक्त तेजस्विनी मोरे, विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी कृती समितीचे निमंत्रक डॉ. प्रविण कोडोलीकर उपस्थित होते.

तरुण भारत

# कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले चरित्र पुस्तकाचे उद्या प्रकाशन

कोल्हापूर : लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा घेवून नाशिक आणि कोल्हापुरात शैक्षणिक, सामाजिक, कार्य करणाऱ्या कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले यांच्यावरील प्राचार्य विलास पोवार लिखित पुस्तकाचे प्रकाशन गुरूवार १८ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता शाहू स्मारक भवनमध्ये होणार आहे. 'कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले : चरित्र व कार्य" असे या पुस्तकाचे नाव आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते होणाऱ्या या प्रकाशन कार्यक्रमाला मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सकाळ

# बी.व्होक. अभ्यासक्रम ३४ महाविद्यालयांत

## कौशल्यविकासाला गती; १६ अभ्यासक्रमांना मान्यता; प्रात्यक्षिकाची जोड मिळणार

ओंकार धर्माधिकारी :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या ३४ महाविद्यालयांमध्ये बी.व्होक. अभ्यासक्रम सुरू केला आहे. 'नॅशनल स्किल क्वालिटी फ्रेमवर्क' या योजनेअंतर्गत या अभ्यासक्रमांना मान्यता दिली असून यामध्ये शेती, ऑटोमोबाईल, केमिकल, पेट्रोकेमिकल टेक्नॉलॉजी, हस्तकला, शुगर टेक्नॉलॉजी यासह विविध प्रकारच्या १६ अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. हे पारंपरिक अभ्यासक्रम सुरू आहेत.



याचबरोबर ज्यांना कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम अभ्यासायचे आहेत त्यांच्यासाठी बी.व्होक. अभ्यासक्रम सुरू केला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या ३४ महाविद्यालयांनी या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून परवानगी मिळवली आहे. काही महाविद्यालयांचे प्रस्ताव परवानगीच्या प्रतीक्षेत आहेत. औद्योगिक क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता ओळखून हे अभ्यासक्रम बनवले आहेत. यासाठी विद्यार्थ्यांकडून शुल्कही घेतले जाणार आहे. या अभ्यासक्रमांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिकाचीही जोड दिली आहे. त्या त्या विषयाच्या इंडस्ट्रींमध्ये या विद्यार्थ्यांना कामाचा अनुभवही दिला जाणार आहे. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच बी. व्होक. कोर्सची रचना करताना ती विविध टप्प्यात केली आहे. यामध्ये सहा महिन्यांचा प्रमाणपत्र कोर्स, एक वर्षाचा डिप्लोमा कोर्स, दोन वर्षांचा ॲडव्हान्स डिप्लोमा कोर्स आणि तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम अशी बी.व्होक. कोर्सची रचना आहे. यातील कोणत्याही कालावधीच्या कोर्सला विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. यातील बहुतांश कोर्सला १२ वी नंतर कोणत्याही शाखेचा विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. त्यामुळे ज्यांना या विषयांमध्ये रस आहे असे विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. विद्यार्थ्यांमधील कौशल्यांचा विकास व्हावा, औद्योगिक क्षेत्राला कुशल मनुष्यबळ मिळावे, या उद्देशाने हे अभ्यासक्रम बनवण्यात आले आहेत.

### असे आहेत अभ्यासक्रम

ॲग्रिकल्चर, ऑटोमोबाईल, केमिकल टेक्नॉलॉजी, केमिकल अँड पेट्रोलियम टेक्नॉलॉजी, सी.ए.एन.ई ॲग्रिकल्चर अँड शुगर टेक्नॉलॉजी, हेल्थकेअर, नर्सिंग, मिडीया अँड एंटरटेन्मेंट, कंप्युटराईज्ड आर्ट ॲण्ड स्केच टेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर अँड प्रोग्रॅमिंग, फोटोग्राफी अँड व्हिडिओग्राफी, हँडीक्राफ्ट, ड्रेपरी डिझायनिंग, फूड प्रोसेसिंग अँड पॅकिंग, स्पोर्टस् न्युट्रीशियम अँड फिजिओथेरपी, मार्केटिंग, मॅनेजमेंट, सायबर सिक्युरिटी, ॲनिमेशन फिल्म मेकिंग यासह अन्य काही अभ्यासक्रमांचाही यामध्ये समावेश आहे.

**“ महाविद्यालयांनी आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांची गरज आणि रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन मगच बी.व्होक. अभ्यासक्रम सुरू करावेत. केवळ अनुदानासाठी अभ्यासक्रम सुरू करू नयेत. रोजगाराच्या आणि व्यवसाय सुरू करण्याच्या संधी आहेत.**
**- प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे,**
सदस्य, व्यवस्थापन परिषद

Kolhapur, Main